!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७९ १९-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# परिक्षा गुणवाढ प्रकरणी अधिकारी व संस्थावर कठोर कारवाई करा : युवासेनेची विभागीय आयुक्ताकडे मागणी

**संभाजीनगर ( ता. २२ ) :** राज्यात कॉफीमुक्त परिक्षेचे धडे देणारे शिक्षक व संस्थाच गैरप्रकाराला खतपाणी घालत आहे. यामुळे अभ्यासु विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. नुकत्याच जालना जिल्ह्यातील पोलिसांनी धाडसत्रात २५०० पैक्षा जास्त कोऱ्या उत्तरपत्रिका, स्टिकर आदि परिक्षा साहित्य जप्त केले. यामध्ये परिक्षा मंडळाबरोबर सहभागी व दोषी अधिकारी व संस्था यांच्यासह कठोर कारवाई करण्याची मागणी आज युवासेनेच्यावतीने विभागीय आयुक्तांकडे निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य जगन्नाथ काकडे पाटील, जिल्हायुवाधिकरी नगरसेवक ऋषिकेश खैरे, जिल्हायुवाधिकारी संतोष माने, शहराधिकारी किरण तुपे, सतीश पवार, नारायण सुरे, कॉलेजकक्षप्रमुख ऋषिकेश जैस्वाल, विद्यापीठ प्रमुख तुकाराम सराफ आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या अनेक वर्षापासुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी कॉफीमुक्त महाराष्ट्र धोरण शासन राबवित आहे. त्यासंबंधी अनेक महाविद्यालये, संस्थ जनजागृती करीत आहे. परंतु ज्यांच्यावर विश्वास ठेवून परिक्षा मंडळ उत्तर पत्रिका, प्रश्नपत्रिका देतात, त्यांनीच विश्वासघात करुन पैशासाठी असे गैरप्रकार करतात. हे चुकीचे आहे, करिता लवकरात लवकर या प्रकरणतील

सर्व छोट्या मोठ्या महाभागांना शिक्षा करावी. सी. आय. डी.मार्फत चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी आयुक्तांच्यावतीने महसुल उपआयुक्त जितेंद्र पापळकर यांनी निवेदन स्विकारले निवेदने देतेवेळी तालुकाप्रमुख बंडू शिंदे, उपशहरधिकारी नंदू म्हस्के, बाळु कुबेर, हर्षवर्धन त्रिभुवन, पराग कुंडलवाल, विशाल आदमाने, विकी गिरे, विशाल खंडागळे, प्रशांत वाघ महेश सुरासे, अक्षय खेडकर, अमोल मत्ते, कमलेश वैष्णव, ज्ञानेश्वर पल्हाळ, बजरंग ठोकळ, नागेश थोरात, नागेश राऊत, अमोल निकाळजे, राजु गोल्डे, शुभम म्हस्के, ललीत कुलकर्णी, श्रावण बिराटे, गिरीष कुमावत, इम्तियाज रब्बानी, शैलेश शेजवळ, प्रदीप नवले, ऋषि शिंदे आदिंसह युवासैनिकांची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525